## बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये

**RTE २५ टक्के प्रवेश प्रकिया सन २०१६-२०१७ ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया नव्याने घेतलेल्या दुस-या फेरीत लॉटरी पध्दतीने निवड यादी जाहीर**

सोलापूर दि.१४/१०/२०१६-सोलापूर जिल्हातील व म.न.पा. प्राथमिक शिक्षण मंडळातर्गत खाजगी प्राथमिक विनाअनुदानित, कायम विना अनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित (अल्पसंख्याक व धार्मिक पाठशाळा वगळून) सर्व माध्यमाच्या वंचित व दुर्बल घटकांसाठी २५ टक्के राखीव प्रवेश प्रक्रिया सन २०१६-२०१७ मध्ये पुर्व प्राथमिक व प्राथमिकच्या एकुण ३१३१ जागेसाठी जिल्हयातून ७११ अर्ज Confirm झाले होते. तीन फे-यामध्ये ५२४ जागा भरल्या असून पुर्व प्राथमिकच्या ३९६ व प्राथमिकच्या इयत्ता पहिलीच्या २२११ जागा शिल्लक राहिलेल्या होत्या. शिल्लक राहिलेल्या रिक्त जागा भरण्यासाठी मा.शिक्षण संचालक पुणे यांचेकडे परवानगी मागण्यात आलेले होती. दि.०५/१०/२०१६ पर्यंत अर्ज करण्यास परवानगी देण्यात आलेली होती.

त्यानुसार दि.०५/१०/२०१६ पर्यंत ३२९ अर्ज आले होते. त्यानुसार दि.१४/१०/२०१६ रोजी NIC पुणे मार्फत लॉटरी पध्दतीने पुर्व प्राथमिकच्या -22-व प्राथमिकच्या इयत्ता पहिलीच्या--169- एकुण-191-निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी www.rte२५admission.maharashtra.gov.in या संकेतस्थळवर उपलब्ध आहे. दि.२०/१०/२०१६ पुर्वी संबंधित शाळांनी यादी काढून घेऊन आपल्या शाळेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे तपासून शासन नियमानुसार प्रवेश निश्चित करून ऑनलाईन अर्ज निश्चित करावे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी संबंधित शाळेत जावून आवश्यक कागदपत्रे व अर्जाची प्रत जमा करून दिलेल्या मुदतीत प्रवेश घ्यावी. प्रवेशाबाबत काही अडचणी असल्यास सोलापूर शहरासाठी प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ नवी पेठ क्रांती साडी सेंटर समोर दगडी इमारत सोलापूर आणि तालुक्यासाठी संबंधित तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती कार्यालयाकडे संपर्क साधावे. ज्या शाळा प्रवेश देण्यास टाळाटाळ करतील त्यांच्या विरूध्द शासन नियमानुसार कारवाई करण्यात येईल. असे आवाहन जिल्हा परिषद सोलापूर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तानाजी घाडगे यांनी केलेले आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्राथ)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

---

जा.क्र.जिपसो/शिक्षण(प्राथ)/आरटीई२५%/२८१/२०१६
सोलापूर दि.१४/१०/२०१६

प्रति,

१. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती-------सर्व
२/-वरील निवेदन आपल्या अधिनस्त शाळांना कळवून स्थानिक दैनिकात प्रसिध्द दयावी.

२. प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण मंडळ सोलापूर महानगरपालिका
२/-वरील निवेदन आपल्या अधिनस्त शाळांना कळवून स्थानिक दैनिकात प्रसिध्द दयावी.

३. मा.संपादक,--------------------
वरील निवेदन आपल्या लोकप्रिय दैनिकात / चॅनेलवर प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

**शिक्षणाधिकारी (प्राथ)**
**जिल्हा परिषद, सोलापूर**